महाराष्ट्र शासन

**पोलीस अधिक्षक कार्यालय, यवतमाळ**

**एल.आय.सी. चौक, यवतमाळ - 445001**

ई-मेल : sp.yavatmal@mahapolice.gov.in

फो.नं. 07232-240286




# -:: यवतमाळ जिल्हा पोलीस दलाकडुन जाहिर आवाहन ::-

**-:: सण/ उत्सवा निमीत्त बाहेरगांवी जातांना घरी चोरी होऊनये म्हणुन घ्यावयाची दक्षता. -::**

- घर कुलुपबंद करुन बाहेरगावी जातांना शेजारी तसेच पहारेकरी यांना घरावर लक्ष ठेवण्याबाबत कळवावे.
- बाहेरगावी जातांना घरातील सोन्या, चांदीचे दागिने किंवा घरातील मौल्यवान वस्तु व रोख रक्कम घरातील कपाटात न ठेवता बँकेमध्ये, लॉकरमध्ये ठेवावे कारण चोरटयांकडुन घरातील कपाट हे अगोदर केंद्रीत (टार्गेट) केल्या जातात.
- घराच्या दरवाजाच्या उच्च प्रतिचे कुलुप व कडी, कोंडा लावावे.
- बाहेरुन दिसणारे घरातील लाईट चालु स्थितीत ठेवावे.
- शक्य असल्यास आपल्या घराच्या अवती भवती चांगल्या प्रतिचे नाईट व्हिजन सी.सी.टी.व्ही कॅमेरे व सुरक्षा अलार्म (बजर) लावण्यात यावे.
- आपल्या गल्लीत साहित्य विक्री करण्याच्या उद्देशाने अनोळखी इसम असल्यास त्या व्यक्तीची सखोल चौकशी करावी. शक्य झाल्यास आपल्या मोबाईलमध्ये त्या इसमाचे फोटो काढुन घ्यावेत.
- आपल्या घराच्या आजुबाजुच्या परिसरातील लाईट रात्रीच्या वेळी चालु स्थितीत राहतील याबाबत दक्षता ध्यावी.
- चोर हे चोरी केल्यानंतर लवकरात लवकर गावाबाहेर पडता यावे या दृष्टीने गावातील किंवा शहराच्या कडेला असणारी घरे हि चोरटयांचे टार्गेट वर असतात त्यामुळे गावच्या किंवा शहराच्या कडेला असणाऱ्या घरमालकांनी जास्त काळजी घ्यावी.
- आपल्या गल्लीत किंवा गावामध्ये ग्रामसुरक्षा दल स्थापन करुन आळीपाळीने आपल्या गल्लीत किंवा गावात रात्र गस्त ठेवावी.
- सोशल मिडीयावर प्रवासाची माहिती किंवा घर बंद राहणार आहे अशी कुठलीही पोस्ट करु नये.
- वृत्तपत्रे , दुध, कुरियर किंवा पत्रे दरवाज्याशी साचु देऊ नये.
- रात्री घरातील एखादे दिवे टायमरवर सुरु बंद होईल अशी व्यवस्था करावी, जेणेकरुन घर बंद असल्याचे भासणार नाही.
- दिर्घकाळासाठी बाहेर जात असल्यास स्थानिक पोलीस स्टेशनला माहिती देऊन घराबाबत लक्ष ठेवण्याची विनंती करावी.
- परिसरात संशयास्पद हालचाल आढळल्यास त्वरीत पोलीसांना माहिती दयावी.

**अत्यावश्यक सेवा क्रमांक :- 112**

**पोलीस नियंत्रण कक्ष, यवतमाळ :- 07232-256700**

**संबंधीत पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा.**

**यवतमाळ पोलीस दल आपल्या सेवेसाठी 24 तपास सतर्क आहे.**